भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ८४० / माहिती कक्ष / वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/१२/२०१६

१) पैशाची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक २४/१२/२०१६ चे आज पर्यत यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करून यातील फिर्यादी सौ. सिमा मिलींद वैदय वय ४० वर्ष रा. चिचाळ यांचे वित्तीय आस्थापनेस सावध ठेवी करीता रक्कम गुंतवीण्यास अप्रमानीकपणे प्रवृत्त करून गुंतविलेल्या जमा रकमेच्या बाबतीत फौजदारी प्राप्त न्यायभंग करीत गुंतविलेल्या रक्कमेची मुदत संपल्यानंतरही ज्या रक्कमेचा लाभांष भायदा याची पतफेड करण्यास कपटपुर्णरितीने कसुरी करून फिर्यादीची ८६,०००/–रू. ची फसवणुक केल्याने फिर्यादी चे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ४०९,४२०,३४ भादवी.सहकलम ३ महाराष्ट्र ठेवीदाराचा वित्तीय आस्थापना वरील हितसंबधाचे रक्षन करण्याचा कायदा १९९९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी नेवारे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

२) सार्वजनीक मालमततेची नुकसान केल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक २२/१२/२०१६ चे १२.०० वा. दर. यातील गट क्र. २८३ मधील महसुलीचे सार्वजनीक बोळीचे यातील आरोपीने कोणतीही परवानगी न घेता बोळीचे पाळीचे खोदकाम करून पाळीवरील आंब्याचे एक झाड पाडुन शासकीय बोळीच्या पाळीचा व आंब्याच्या झाडाचे अंदाजे ६०,०००/–रू चे नुकसान करून शासकीय संपत्तीची आगळीक केल्याने फिर्यादी ताराचंद धांडुजी मेश्राम वय ३६ वर्ष रा. सेंदुरवाफा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३ (ई) सार्वजनीक संपत्ती हानी प्रती कायदा १९८४ सह कलम ४२७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा भजने पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

३) शेतावर लावलेल्या मोटांरीची चोरी. :–

दिनांक २३/१२/२०१६ चे २३.३० ते २४/१२/२०१६ चे ०३.०० वा. दर. यातील फिर्यादी गुलाब गोपीचंद बुरडे वय ६० वर्ष रा. मोहगाव यांचे व शेता शेजारील शेतकऱ्याचे शेताजवळील नाल्यावर लावलेल्या मोटार, विजय हरीराम बोन्द्रे यांची करूना कंपनीची २ एच.पी, श्रीराम नथ्थु बोन्द्रे यांची बिबिसी. कंपनीची ३ एच.पी, मधुकर दयाराम बोन्दे यांची जॉनसन्स कंपनीची ३ एच.पी, राजकुमार बळीराम बोन्द्रे यांची बिबिसी.कंपनीची ३ एच.पी, व फिर्यादीची मोनोष्बॉक कंपनीची ५ एचपी, च्या लावलेल्या ५ मोटारी एकुन कि. ३५,०५०/–रू. च्या कोणीतरी अज्ञात चोराने कोनीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी गुलाब गोपींचद बुरडे वय ६० वर्ष रा. मोहगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा सलामे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

४) अज्ञात वाहनाच्या धडकेत अनोळी इसमाचा मृत्यु . :–

दिनांक २३/१२/२०१६ चे २३.३० वा. दर. यातील अनोळखी मृतक हा एनएच ०६ शहापुर ते पेट्रोलपंप रोडने पायी जात असता कोणीतरी अज्ञात आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयीगयीने व निष्काळजीपने भरधाव वेगाने चालवुन अपघात करून अज्ञात व्यक्तीचा मृत्युस कारणीभुत होवुन अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी पाटील पो.स्टे. जवाहरनगर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९, ३०४ (अ) भादवी. सहकलम १८४,१३४/१७७ मोवका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी आळे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.